● मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २०० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## ... तोपर्यंत काम बंद आंदोलन

### साबा विभागात यंत्रसामुग्री जमा; शासकीय कंत्राटदार संघटना आक्रमक



**जालना । प्रतिनिधी -** गेल्या सात महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर जिल्हा मार्गासाठी ४.५ टक्के आणि राज्य मार्गासाठी १.५टक्के गुणोत्तराने निधी मिळाला असून ही शासनाची क्रुर वागणूक असून या वागणुकीचा जालना जिल्हा शासकीय कंत्राटदार संघटनेच्यावतीने तीव्र निषेध नोंदविण्यात आला असून पन्नास टक्के निधी प्राप्त होई पर्यंत काम बंद आंदोलन सुरुच राहणार असल्याचेही आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे. कंत्राटदारांकडील सर्व मशिनरी सार्वजनिक बांधकाम विभागात जमा केल्या आहेत.

यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ७ महिन्याच्या प्रतिक्षेनंतर जिल्हा मार्गासाठी ४.५% आणि राज्यमार्गासाठी १.५% या गुणोतराने निधी प्राप्त झाला आहे. कंत्राटदारांना अक्षरशः अतिशय कृरपणे महाराष्ट्र शासन वागणूक देत आहे. मशीनरीचे कर्ज हप्ते, मजुरांच्या मजुरी, कामगारांचे वेतन, डांबर, सिमेंट, क्रेशरची मटेरियल्स या सर्व घटकांची देणी आम्ही फेडू शकत नाहीत. म्हणून आजपासून सगळी मशीनरी सार्वजनिक बांधकाम विभाग परिसरात जालना येथे जमा करत आहोत. ५०% निधी प्राप्त होईल तेव्हाच कामे सुरू होतील, तोपर्यत काम बंद आंदोलन चालू राहील.

सार्वजनिक बांधकाम विभाग जालना कार्यालया समोर सर्व कंत्राटदारांनी काम बंद करून यंत्रसामुग्री जमा केली आहे. प्रसंगी ठिय्या आंदोलन करून इंजिनिअर स्मिता पवार यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी जालना जिल्हा शासकीय कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत घुले, अमित देशमुख, जगदीश नागरे, सलीम, शैलेश देविदान, रवींद्र आनंद, अमित खालापुरे, सुधाकर निकाळजे, शरद टोपे, सुधाकर पवार, संदीप हिवराळे, स्वप्नील गायकवाड, सागर बर्दापूरकर, योगीराज देशमुख, प्रतिक दानवे, गणेश नळगे, राजेश खडके, धनराज लोंढे, कारभारी वाघ, हिंमतराव शिंदे, विश्वंभर भुतेकर, बाबासाहेब उढाण, रामप्रसाद काकडे, प्रकाश जायभाये, अजिंक्य राठोड, गौरव कावळे, कुणार ठाकूर आदींची उपस्थिती होती.

## दुभाजकांना मुहूर्त मिळणार का?

### आयुक्तसाहेब दुर्घटनेची वाट पाहताय काय?



**जालना । प्रतिनिधी -** गांधी चमन ते रेल्वे स्टेशन रोडवरील मार्गावर दुभाजकांसाठी सोडलेल्या जागेवर अद्यापपर्यंत दुभाजक बसविण्यात आले नाही. मुळात जालना शहर महानगर पालिकेच्यावतीने याठिकाणी दुभाजक बसवावे की, खड्डे बुजवून टाकावे याबाबत द्विधा असल्याचे दिसून येत आहे. याच मार्गावर रस्त्यावर आलेल्या वीजेच्या खाबांमुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. नुतन वसाहत रोड वरील अशाच प्रकारच्या रस्त्यावरील खाबांमुळे एका पोलीस कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. आता महानगर पालिका काय रेल्वे स्टेशन- गांधीचमन रोडवर अशाच दुर्घनेची वाट पाहतेय की काय असा प्रश्न सामन्य जनेतून आयुक्तांना विचारण्यात येत आहे. एक तर खड्डे बुजवा अथवा दुभाजक बसवा काही तरी करा अशी मागणी जनतेतून होत आहे. यापुर्वीदेखील विविध पक्ष, संघटनांनी याबाबत मनपा आयुक्तांना निवेदन दिलेले आहे. तरी देखील मनपा प्रशासन लक्ष देत नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## मिरवणुकीत शस्त्र बाळगल्या प्रकरणी दोन जणाविरुद्ध गुन्हा दाखल

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा शहरात मुख्य रस्त्यावरून काढण्यात आलेल्या मिरवणुकी दरम्यान हातामध्ये शस्त्र बाळगल्या प्रकरणी सुरेश भुरा पवार राहणार खोराड सांगवी व अमोल दिलीप जाधव राहणार हिवरखेडा या दोन जनाविरुद्ध मंठा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मंठा शहरात (ता.१६) रविवार रोजी संत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकी दरम्यान हातामध्ये शस्त्र बाळगून मिरवणुकीमधील नागरिकाच्या जीवनात धोका निर्माण होईल अशा स्थितीमध्ये फिरवल्याप्रकरणी मंठा पोलिसांत पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या सूचनेवरून आनंद ढवळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे करीत आहेत.

युवा आदर्श

### कोत्तापल्लेजी ...

**नागनाथ कोत्तापल्ले**
**विविधांगी साहित्यिक**
**इंद्र धनुष्य समान रंग**
**टिकाकार चिकीत्सक**
**कथा काव्य कादंबरी**
**कैकप्रकार आगळीक**
**दीर्घ कथा ललित गद्य**
**रे निबंध प्रबंध लेखक**
**विविध समग्र साहित्य**
**कधी बनले समिक्षक**
**विद्यापीठात कुलपती**
**संम्मेलनात अधिक्षक**
**आगळे भिन्न व्यक्तीत्त्व**
**उपक्रमशील प्राध्यापक**
**घडवले किती आयुष्य**
**हाडाचे असे अध्यापक**
**विविध विषयात लेखन**
**राजकीय न् सामाजिक**
**सकस साहित्य प्रत्येक**
**वैचारिक न् सांस्कृतिक**
**शास्त्र शुध्दता मराठीला**
**रे दिधली दृष्टी व्यापक**
**रस्ता दाखवला अनेका**
**बनला दीपस्तंभ दीपक**
**श्रध्दांजली साश्रुनयना**
**निर्वर्तला सार्थ शिक्षक**
**होणार नाही असा दुजा**
**पुन्हा संस्कृती संरक्षक**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## प्रत्येकाने गुरु केलाच पाहिजे - राहुल महाराज जोशी

### हभप श्रीहरी रसाळ महाराज यांचे आज हरिकिर्तन

**जालना । प्रतिनिधी -** आपल्या जीवनात गुरुला अनन्य साधारण महत्व असून आपल्या जीवनात गुरु असलाच पाहिजे. नव्हे तर तो आपण केला पाहिजे, असा हितोपदेश हभप राहुल महाराज जोशी यांनी येथे बोलतांना दिला.

श्री. जोशी महाराज सहकार बँक कॉलनीत आयोजित अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या भागवत कथेचे चौथे पुष्प गुफतांना बोलत होते. यावेळी संस्थानचे सचिव संपतराव पाटील, शिरिष सांगोळे, हभप तुकाराम महाराज मुंढे, हभप आत्माराम महाराज बिडवे आदींची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलतांना जोशी महाराज म्हणाले की, लग्न जुळतांना पत्रिका जरी जुळली तरी गुरु जुळत नसल्यामुळे लग्न मोडल्याची उदाहरणे आपण पाहिली आहेत. गुरु चांगला असेल तर आपले कुणीच काही बिघडवू शकत नाही. त्यामुळे आपल्या जीवनात



गुरुला अनन्य साधारण असे महत्व असल्याचेही जोशी महाराज म्हणाले.

दरम्यान, किर्तन सेवेत श्री हभप दिनेश महाराज उंडे यांनी, सांगतो तुम्हासी, भजारे विठ्ठला। नाही तरी गेला, जन्म वाया।। ह्या तुकाराम महाराजांच्याा अभंगावर निरुपन केले. ते म्हणाले की, जो विठ्ठला भजतो तोच या जगात तारल्या जातो. अन्यथा नाही. म्हणून प्रत्येक जीवाने विठ्ठल नाम घेतले पाहिजे, त्याला आपला जीव ओवाळून टाकला पाहिजे, तरच अशा जीवाचे भले आहे. अन्यथा नाही.

### मंठा नगरपंचायत उपनगराध्यक्ष पदी सौ. छायाताई वाघमारे बिनविरोध

## आमदार लोणीकरांमुळे १५ वर्षांनंतर सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय मिळाला - नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा नगरपंचायत च्या उपनगराध्यक्ष पदी सौ.छाया अरुण वाघमारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली .

नगरपंचायत मंठा सभागृहामध्ये पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी परतुर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित नगरपंचायत सदस्यांमधून उपनगर अध्यक्ष पदाच्या निवडणुकी मध्ये नगरपंचायतचे मुख्याधिकारी दीपक इंगोले , प्रशासकीय अधिकारी मुजमिल अन्सारी यांच्या सहाय्याने सौ छाया अरुण वाघमारे यांची बिनविरोध नगर उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली यावेळी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकरांनी शुभेच्छा देऊन मंठा शहरातील आगामी विकास कामात निधीची कम तरता पडू देणार नाही असे सांगितले , मंठा शहराच्या इतिहासात तब्बल २९ वर्षानंतर अनुसूचित जातीला मिळालेले हे पद असून यापूर्वी मंठा ग्राम पंचायत मध्ये पंडितराव गुणाजी वाघमारे यांची १९९६ दरम्यान सरपंच पदी निवड झाली होती. त्या पाठोपाठ सौ छाया अरुण वाघमारे यांची २९ वर्षानंतर ही निवड झाल्याने एका सर्वसामान्य तळागाळातील व्यक्तीची काळजी करणारा , सर्वसामान्य कार्यकर्त्यप्रती संकट समयी धावून जाणाऱ्या कार्यकर्त्याला आमदार लोणीकरांच्या माध्यमातून खरा न्याय मिळाला असल्याची जनभवना आज नागरिकातून व्यक्त झाली.




यावेळी नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, नगरसेवक जे. के. कुरेशी, नगरसेवक नितीन राठोड, नगरसेवक नारायण दवणे, नगरसेवक दीपक बोराडे, नगरसेवक अचित बोराडे, नगरसेवक राजेश खंदारे, नगरसेवक प्रल्हादराव बोराडे, नगरसेवक प्रसाद बोराडे, नगरसेवक शेख साजिद, नगरसेवक बाजखा पठाण, नगरसेवक उबेद बागवान, नगरसेवक सचिन बोराडे, नगरसेवक विकास सूर्यवंशी,गौतम सदावर्ते,परमेश्वर मानकर,दादाराव हिवाळे, प्रकाश घुले,रंगनाथ वटाणे, शरद मोरे, शैलेश वटाणे,अशोक अवचार, ॲड. सिद्धार्थ अवसरमोल, गजानन माळकर, अभिजीत कोदंडे,अतुल खरात, महादेव पाखरे, प्रदीप उघडे, समाधान शिंदे, नामदेव देशमाने,भगवान वाघ, महेंद्र टेकुळे,आर.डी खंदारे, शुभम अंभोरे, अजय खंदारे,

पान २ वर

## गोळ्या-बिस्कीट विकून शिकलेला कोरेगावचा समीर झाला पोलीस !

**परतूर । प्रतिनिधी -** मनात जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रम करण्याची तयारी असेल तर यशाला नक्कीच गवसणी घालता येते. अर्थात मनापासून प्रयत्न केले तर सर्व काही साध्य करता येते हे स्वतःच्या कृतीतून दाखवून दिले आहे ते तालुक्यातील कोरेगाव येथील समीर पाशाभाई शेख या विद्यार्थ्याने.गोळ्या-बिस्कीट विकून शिक्षण घेतलेल्या समीरची आता मुंबई पोलिसात निवड झाली आहे.

परतूर-सेलू रोडवर बागेश्वरी साखर कारखान्याच्या पाठीमागील बाजूस कोरेगाव हे छोटेसे गाव आहे. गावातील विविध जातीधर्माचे लोक येथे गुण्यागोविंदाने राहतात. पाशाभाई मियालाल शेख त्यापैकीच एक घरी अठरा विश्वे दारिद्र्य. परिस्थितीशी दोन हात करत पाशाभाई गोळी-बिस्किटे विकून घरसंसार चालवितात. वेळप्रसंगी अर्धपोटी राहून त्यांनी मुलांना शिकविले. घरचा खर्च भागविताना वडिलांची होत असलेली तारांबळ पाहता समीरने गोळ्या-बिस्कीट विकायला सुरुवात केली. गोळ्या-बिस्कीट विकून समीरने शिक्षण मात्र सुरूच ठेवले. समीरने पोलीस भरतीची तयारी सूरू केली. दिवसभर गोळ्या-गोळ्या बिस्कीटे विकायची. आलेले पैसे वडिलांना द्यायचे आणि रात्री परीक्षेचा अभ्यास करायचा असा समीरचा

पान २ वर



## महाकुंभमेळ्याला 'फालतू' म्हणणाऱ्या लालूप्रसाद यादव यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करा!

### हिंदु जनजागृती समितीची मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** १४४ वर्षांतून एकदा येणार्या महाकुंभमेळ्याला भारतातील ५० कोटींहून अधिक हिंदू भाविक आणि ५० हून अधिक देशांतील लाखो विदेशी मोठ्या श्रद्धेने येत आहेत. आनंद अनुभवत आहेत. जगभरातील शास्त्रज्ञ, अभ्यासक आणि विचारवंत महाकुंभाच्या अध्यात्मिक आणि वैज्ञानिक महत्त्वाची दखल घेतात. अशा वैश्विक महोत्सवाला 'फालतू' म्हणणारे माजी केंद्रीय रेल्वे मंत्री आणि राजद प्रमुख लालूप्रसाद यादव यांनी कोट्यवधी हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. हिंदु जनजागृती समिती या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध करत असून लालूप्रसाद यादव यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सरकारकडे करत आहे !



दिल्लीतील रेल्वे स्थानकात झालेल्या चेंगराचेंगरीविषयी प्रतिक्रिया व्यक्त करतांना लालूप्रसाद यादव यांना महाकुंभमेळ्यातील गर्दीबाबत विचारले असता कुंभला काही अर्थ नाही. कुंभ फालतू आहे, असे आक्षेपार्ह वक्तव्य त्यांनी केल्याचे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिले आहे. लालूप्रसाद यादव यांनी कधीही अन्य धर्मियांच्या तीर्थयात्रांबाबत अशा प्रकारचे अपमानास्पद

पान २ वर

## संपादकीय

### वादाशिवाय साहित्य संमेलन व्हावे!

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी दिल्ली येथे मराठी भाषेतील ज्येष्ठ लेखिका तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या संमेलनाची तयारी पूर्ण झाली असून साहित्य रत्नांचे स्वागत करायला देशाची राजधानी सज्ज झाली असून या संमेलनाची कार्यक्रम पत्रिकाही नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. यावेळच्या साहित्य संमेलनाचे वैशिष्ट म्हणजे या साहित्य संमेलनाचे उदघाटन देशाच्या पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २१ फेब्रुवारी रोजी ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उदघाटन करणार असून यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपस्थित राहणार आहे. हे संमेलन दिल्लीतील ताल कटोरा स्टेडियमवर होणार असले तरी उदघाटन सोहळा मात्र दिल्लीतील विज्ञान भवनात होणार आहे. या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार हे असून या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने राजकीय नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. राजकीय नेत्यांसोबत साहित्य रसिकही या संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशातील अनेक राज्यातून मराठी माणूस या साहित्य संमेलनाला हजेरी लावेल असा विश्वास आयोजकांना आहे. दिल्लीत होणाऱ्या हे साहित्य संमेलन दिल्लीत राहणाऱ्या मराठी भाषिकांसाठी तर पर्वणीच ठरणार आहे. दिल्लीत बहुसंख्य मराठी भाषिक आहेत ते साहित्य संमेलनाला हजर राहणार यात शंका नाही त्यामुळेच दिल्लीत होणारे हे साहित्य संमेलन ऐतिहासिक ठरेल यात शंका नाही. या साहित्य संमेलनात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चा तसेच भरगच्च कार्यक्रम होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षा तारा भवाळकर यांच्या भाषणाकडे साहित्य वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. संमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे तसेच अनेक ठराव करण्यात येणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याने या साहित्य संमेलनाचे वेगळे महत्व आहे त्यामुळेच हे साहित्य संमेलन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. साहित्य संमेलन आणि वाद हे समीकरण गेल्या काही वर्षापासून बनले आहे. हे समीकरण यावेळी तरी बदलावे, या साहित्य संमेलनाला कोणत्याही वादाचे गालबोट लागू नये अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. अजून तरी या साहित्य संमेलनाविषयी कोणताही वाद उत्पन्न झाला नाही ही आनंदाची बाब आहे. असेच वादाविना साहित्य संमेलन पार पडावे. साहित्य संमेलन म्हणजे सारस्वतांचा मेळा वारकरी ज्या प्रमाणे पंढरपूरची वारी न चुकता करतात त्याप्रमाणे साहित्यिकही न चुकता संमेलनाला हजेरी लावतात. साहित्य रसिकही साहित्यिकांचे विचार विचार, चर्चा ऐकण्यासाठी आतुर असतात पण दरवेळी नको त्या विषयावर वाद होतो आणि त्या वादाच्या छायेतच साहित्य संमेलन पार पडते. त्यामुळे साहित्य संमेलनाचा मूळ उद्देशच भरकटतो. माध्यमात देखील त्या वादावरच चर्चा होते त्यामुळे साहित्य रसिकांचा मोहभंग होतो. त्यामुळे वादा शिवाय साहित्य संमेलन पार पडेल याची दक्षता आयोजकांनी घ्यावी. याशिवाय संमेलन आणखी लोकप्रिय होऊन तरुणाई या साहित्य संमेलनाकडे कशी आकर्षित होईल याचाही विचार आयोजकांनी करावा. आजचे तरुण सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करतात. तरुण वर्गाला साहित्य संमेलनामध्ये आकर्षित करायचे असेल आयोजकांनी साहित्य संमेलनाला समाज माध्यमांशी जोडावे. आयोजकांनी साहित्य संमेलनाचे सर्व अपडेट फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, ट्विटर या सारख्या समाज माध्यमांवर द्यावीत म्हणजे तरुणाईत देखील साहित्य संमेलन लोकप्रिय होईल. देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत होत असलेल्या हे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन लोकप्रिय होऊन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल ही अपेक्षा . ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

**पान १ वरुन**

### आमदार लोणीकरांमुळे ...

आप्पासाहेब गवळी, अनिकेत देशमाने, विलास काऊतकर, अहिंसक वाघमारे, मारुती खनपडे, उद्धव सरोदे, विलास काऊतकर, अहिंसक वाघमारे, विजेश वाघमारे यांच्यासह सारनाथ युथ च्या सदस्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

### गोळ्या - बिस्कीट ...

दिनक्रम झाला. १२ जानेवारी रोजी मुंबईतील परीक्षा केंद्रावर त्याने परीक्षा दिली. ८ फेब्रुवारी रोजी निकाल लागला. पहिल्याच प्रयत्नात समीरला यश मिळाले आणि तो पोलीस खात्यासाठी त्याची निवड झाली.

या यशाबद्दल समीरच्या कुटुंबासह गावकऱ्यांना मोठा आनंद झाला आहे.परतुरचे सामाजिक कार्यकर्ते भगवानराव मोरे, अर्जुन पाडेवार यांनी समीर व त्यांच्या वडिलांचा गावात जाऊन सत्कार केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### महाकुंभमेळ्याला फालतू ...

वक्तव्य केले आहे का? हिंदु धर्म आणि त्यांच्या श्रद्धास्थानांचा अपमान करण्याची ही प्रवृत्ती हिंदू समाज सहन करणार नाही. अनेक वर्षे तुरुंगात काढल्यानंतरही अपराधांविषयी खंत वाटत नसलेल्या लालूप्रसाद यादव जामिनावर बाहेर असताना ते हिंदू समाजाच्या श्रद्धास्थानांचा अपमान करणारी वादग्रस्त विधाने करत असतील, तर हा समाजात तेढ निर्माण करण्याचा आणि हिंदूंच्या भावना भडकवण्याचा प्रयत्न आहे. याची सरकारने गंभीर दखल घेतली पाहिजे, असेही समितीने म्हटले आहे.

# महाराष्ट्राबाहेर पुन्हा एकदा अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचा डंका!

यावर्षी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन राजधानी नवी दिल्ली येथे होत आहे. या आधी तब्बल बावीस वेळा महाराष्ट्राबाहेर साहित्य संमेलने झाली आहेत. यंदाही हे संमेलन अनेक कारणांसाठी विशेष ठरणार आहे.

केंद्र सरकारकडून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिले साहित्य संमेलन आहे. यामुळे हे संमेलन ऐतिहासिक असेल. हा सोहळा मराठी भाषिक, साहित्यप्रेमींसाठी एक अभिमानास्पद क्षण ठरणार आहे. यामुळे संपूर्ण भारतभर आणि परदेशात विखुरलेल्या मराठी जनामनास एकत्र येण्याची संधी मिळणार आहे. या संमेलनामुळे मराठीचा लौकिक अधिक वृद्धिंगत होईल. विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणारे उद्घाटन हा मराठी भाषिकांसाठी अभिमानाचा क्षण असेल.

**अशी आहे मराठी साहित्य संमेलनाची गौरवशाली परंपरा**

मराठी साहित्य संमेलनाची मुहूर्तमेढ १८७८ मध्ये पुण्यात रोवली गेली. त्यानंतर महाराष्ट्राबाहेर मराठी साहित्याच्या प्रचार-प्रसारासाठी अनेक संमेलने महाराष्ट्राबाहेर पार पडली आहेत. विशेष म्हणजे १८७८ मध्ये सुरू झालेली साहित्य संमेलनाची परंपरा आजही सुरू आहे. पहिले संमेलन १८७८ मध्ये पुणे येथे पार पडले.

यानंतर १९०९ मध्ये म्हणजेच तब्बल २१ वर्षांनी सातवे संमेलन बडोदा (गुजरात) येथे पार पडले.

१९१७ मध्ये म्हणजेच तब्बल आठ वर्षांनी दहावे संमेलन मध्यप्रदेश मधील इंदूर येथे पार पडले.

१९२१ मध्ये तब्बल चार वर्षांनी अकरावे संमेलन बडोदा (गुजरात ) येथे पार पडले.

१९२८ मध्ये तब्बल सात वर्षांनी चौदावे संमेलन मध्यप्रदेशमधील ग्वाल्हेर येथे पार पडले.

१९२९ मध्ये पंधरावे संमेलन कर्नाटकमधील बेळगाव येथे पार पडले.

१९३० मध्ये सोळावे संमेलन गोव्यातील मडगाव येथे पार पडले.

१९३१ मध्ये सतरावे संमेलन तेलंगणातील हैद्राबाद येथे पार पडले.

१९३४ मध्ये तब्बल चार वर्षांनी विसावे संमेलन बडोदा (गुजरात) येथे पार पडले.

१९३५ मध्ये एकविसावे संमेलन मध्यप्रदेशमधील इंदूर येथे पार पडले.

१९४६ मध्ये तब्बल अकरा वर्षांनी ३० वे संमेलन कर्नाटकमधील बेळगाव येथे पार पडले.

१९४७ मध्ये ३१ वे संमेलन तेलंगणातील हैद्राबाद येथे पार पडले.

१९५१ मध्ये तब्बल चार वर्षांनी ३४ वे संमेलन कर्नाटक मधील कारवार येथे पार पडले.

१९५३ मध्ये ३६ वे संमेलन गुजरातमधील अहमदाबाद येथे पार पडले.

१९५४ मध्ये ३७ वे संमेलन दिल्ली येथे पार पडले.

१९६१ मध्ये ४३ वे संमेलन तब्बल सात वर्षांनी मध्यप्रदेशमधील ग्वालेहर येथे पार पडले.

१९६४ मध्ये ४५ वे संमेलन गोव्यातील मडगाव येथे पार पडले.

१९६७ मध्ये ४७ वे संमेलन मध्यप्रदेशमधील भोपाळ येथे पार पडले.

१९८१ मध्ये तब्बल १४ वर्षांनी ५६ वे संमेलन छत्तीसगडमधील रायपूर येथे पार पडले.

२००० मध्ये ७३ वे संमेलन तब्बल १९ वर्षांनी कर्नाटक मधील बेळगाव येथे पार पडले.

२००१ मध्ये ७४ वे संमेलन मध्यप्रदेशमधील इंदोर येथे पार पडले.

२०१५ मध्ये तब्बल १४ वर्षांनी ८८ वे संमेलन पंजाबमधील घुमान येथे पार पडले. त्यानंतर २०१८

२०१८ मध्ये ९१ वे संमेलन गुजरात मधील बडोदा येथे पार पडले.

यानंतर यंदा तब्बल ७ वर्षांनी पुन्हा २०२५ मध्ये ९८ वे संमेलन महाराष्ट्राबाहेर दिल्ली येथे पार पडणार आहे.

**मराठी भाषा, संस्कृती आणि साहित्याचा जागर**

मराठी ही केवळ एक भाषा नसून शब्द, साहित्य, संगीत, कला आणि संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. संत साहित्यापासून ते आधुनिक काव्यापर्यंत, लोककथांपासून आधुनिक कादंबऱ्यांपर्यंत, नाटकांपासून चित्रपटांपर्यंत मराठी साहित्याचा वारसा अत्यंत समृद्ध आहे. या संमेलनात मराठी साहित्यविश्वातील मान्यवर लेखक, कवी, समीक्षक आणि रसिक वाचक एकत्र येणार आहेत. विविध चर्चासत्रे, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शने आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून मराठी भाषेचे भवितव्य उजळवण्याचा संकल्प केला जाणार आहे.

**या भव्य सोहळ्याचा भाग बना!**

दिल्लीतील हे साहित्य संमेलन मराठी संस्कृतीचा उत्सव आहे. साहित्यप्रेमी, लेखक, कवी, विद्यार्थी आणि मराठी भाषा जपणाऱ्या सर्वांनी या ऐतिहासिक सोहळ्याचा साक्षीदार होण्याची ही सुवर्णसंधी आहे. आपली मराठी संस्कृती जपण्यासाठी, तिचा जागर करण्यासाठी आणि नव्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी आपण सर्वांनी या सोहळ्यात सहभागी व्हावे. चला, तर मग मराठी साहित्याचा हा ऐतिहासिक उत्सव दिल्लीच्या ऐतिहासिक भूमीवर भव्य स्वरूपात साजरा करूया!

**- वर्षा फडके- आंधळे, वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)**

# मराठीला आकार देणारे महानुभाव साहित्य

आज आपण बोलत असलेली मराठी ही अनेक स्थित्यांतरे आणि उत्क्रांतीनंतर तयार झालेली समृद्ध भाषा आहे. अशा या समृद्ध साहित्य परंपरा लाभलेल्या मराठी भाषेस केंद्र शासनाने ऑगस्ट २०२४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. आसा दर्जा प्राप्त झाल्यानंतर प्रथमच नवी दिल्ली येथे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. त्यानिमित्ताने मराठी साहित्याचा पाया असणाऱ्या महानुभाव पंथाच्या साहित्याचा घेतलेला हा धांडोळा. आजच्या आपल्या मराठीच्या विकासामध्ये किंबहुना आज वापरात असलेल्या मराठीला आकार देण्याचे महत्वाचे काम केले ते महानुभाव पंथाने, या पंथाच्या साहित्यातील लीळाचरित्र हा चक्रधर स्वामींच्या लीळांवर आधारित ग्रंथ मराठीतील आद्य ग्रंथ म्हणावा लागेल. मराठीच्या विकासात महानुभव पंथाच्या योगदानावर टाकलेला हा प्रकाश.

महाराष्ट्र आणि मराठी विषयी - मराठी भाषेची उत्पत्ती प्राकृतात असल्याचे सर्वश्रुत आहे. प्राकृत भाषेत लिहला गेलेला 'गाथा सप्तशती' हा आद्यः ग्रंथ आणि यातील भाषा ही अस्सल महाराष्ट्राची, गोदावरी खोऱ्यातील आहे. महाराष्ट्र प्रदेशावर साडेचारशे वर्ष राज्य करणाऱ्या सातवाहन कुलातील राजा हाल यांने हा ग्रंथ लिहला. मराठीतील पहिला शिलालेख हा कर्नाटकातील श्रवणबेळगोळा येथील श्री चावुण्ड राये करवियले श्री गंगराये सुत्ताले करवियले हा आहे. तर रायगड जिल्ह्यातील अलिबाग जवळील आक्षी येथे सापडलेला शिलालेख मराठीतील पहिला शिलालेख असल्याचे डॉ शं.गो.तुळपुळे म्हणतात. त्याही आधी 'धर्मोपदेशमाला' (इ.स. ८५९) या ग्रंथात मराठी भाषेचा उल्लेख आहे. सललयि-पय-संचारा पयडियमाणा सुवण्णरयणेल्ला ! मरहठ्य भासा कामिणी य अडवीय रेहंती !! असे मराठीचे वर्णन येते. सहाव्या शतकातील वराह मिहीरच्या बृहत्दसंहितेत महाराष्ट्र देशाचा उल्लेख पहावयास मिळतो. तर महाराष्ट्राचा स्पष्ट उल्लेख महानुभव लेखक डिंबकृष्णमुनी यांनी केल आहे. 'विंध्याद्रीपासौनि दक्षिणदिशेसी।कृष्णनदीपासौनि उत्तरेसी।। झाडीमंडळापासौनि पश्चिमेसि । महाराष्ट्र बोलिजे ।।' असा महाराष्ट्र प्रदेश असल्याचे ते सांगतात. याशिवाय मराठीच्या वापराची उदाहरणे आपल्याला दिवे आगर, पंढरपूर येथील ताम्रपटातून पहावयास मिळतात.

यादव काळात मराठीला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाला. या राजभाषेचा विकास करण्याचे कार्य महानुभाव पंथातील अनेकांनी केले. श्री गोविंदप्रभू, भटोबास, केसोबा, डिंबकुष्णमुनी यांनी मराठीला आकार दिला. पंथियांच्या अनेक साहित्यातून मराठी समृद्ध होत गेली. त्यामध्ये म्हाईंभटांचे लीळाचरित्र, गोविंदप्रभूचरित्र किंवा ऋद्धिपूरचरित्र, केशिराजबास यांचे दृष्टांतपाठ, सिद्धांतसूत्रपाठ, बाईदेवबास यांचे पूजावासर, नरेंद्रस्वामी यांचे रुक्मिणीस्वयंवर, भास्करभट्ट यांचे शिशुपाळवध, उद्धवगीता, दामोरदपंडित यांचे वच्छाहरण, रवळोबास यांचे सह्याद्री महात्म्य, नारो बहाळिये यांचे ऋद्धिपूरवर्णन, विश्वनाथ पंडित यांचे ज्ञानप्रबोध, यासह स्थानपोथी, वृद्धाचार, मार्गरुढी, चरित्र अबाब, महदबेचे धवळे अशा ग्रंथांचा समावेश आहे.

सांकेतीक लिपीचा वापर - महानुभाव साहित्याचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सांकेतीक लिपीचा वापर. या वापरामुळेच अनेक वर्ष हे साहित्य सामान्यांपासून लांब राहिले. पण, याचमुळे हे सर्व साहित्य आहे त्या स्थितीत आज आपल्याला उपलब्ध झाले. यादव काळात १२ व्या शतकात महानुभाव पंथ उदयास आला. पंथियांना मार्गदर्शन करण्यासाठी साहित्याची निर्मिती केली. या साहित्यातूनच अधुनिक मराठीला आकार मिळत गेला. यानंतरच्या काळात वारकरी सांप्रदायांने मराठी अधिक समृद्ध केली.

महानुभाव सांप्रदायाने महाराष्ट्राला दिलेल्या अनेक देणग्यांपैकी एक म्हणजे समृद्ध साहित्य. पंथियांच्या या साहित्यामध्ये सर्वप्रथम उल्लेख करावा लागेल असा ग्रंथ म्हणले स्थानपोथी. चक्रधरस्वामींनी महाराष्ट्रात ज्या ठिकाणी भ्रमण केले त्याची भौगोलिक माहिती देणारा ग्रंथ म्हणजे स्थानपोथी. चक्रधरस्वामींनी भेटी दिलेल्या ठिकाणी पंथियांनी ओटे बांधले आहेत. त्यामुळे आजही आपणास स्थानपोथीतील गावांची, नगरांची माहिती मिळते. यातील अनेक गावे, नगरे आजही अस्तित्वात आहेत. त्यामुळे यादवकालीन महाराष्ट्र समजून घेताना स्थानपोथीचे महत्व अनन्यसाधारण आहे. एकूणच या ग्रंथाच्या माध्यमातून आपणास यादवकाळातील महाराष्ट्राचा भूगोल, संस्कृती, जीवनपद्धती, ग्रामरचना, खाद्य संस्कृती, व्यवहार, प्रशासन, घर बांधणी, व्यापार व व्यवसाय याविषयी सविस्तर माहिती मिळते. त्याकाळच्या महाराष्ट्राचे समग्र दर्शन घडवणारा उत्कृष्ट असा दुसरा ग्रंथ नाही.

लीळाचरित्र मराठीतील पहिला गद्य चरित्रग्रंथ - महानुभाव पंथांचे संस्थापक चक्रधरस्वामी त्यांच्याविषयीच्या आख्यायिकांच्या संग्रहाला लीळाचरित्र असे नाव आहे. महींद्रबास ऊर्फ म्हाईंभट यांनी नागदेवाचार्यांच्या मदतीने चक्रधरांच्या लीळा संकलित केल्या. याचा रचनाकाल सन ११७८ च्या आसपासचा आहे. तत्कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवनाचे मार्मिक चित्रण लीळाचरित्रातून आले आहे. लीळाचरित्राची भाषा म्हणजे यादवकालीन मराठी गद्याच्या समृद्धतेचा उत्तम नमुनाच होय. छोटी छोटी अर्थपूर्ण वाक्ये, अलंकृत साधेपणा हे तिचे विशेष होत. त्यावेळचे खाद्यपदार्थ, वस्त्र, चालीरिती, करमणुकीचे प्रकार, कायदे, सामाजिक सुरक्षा, सण, उत्सव इत्यादी सामाजिक जीवनाच्या दृष्टीने उपयुक्त असे अनेक उल्लेख या चरित्रग्रंथातून आले असल्यामुळे तत्कालीन समाजजीवनाच्या व धार्मिक जीवनाच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. चक्रधरांच्या काळातील वाक्प्रचार, म्हणी यांचा उपयोग करून भाषेला सजविण्याचा प्रयत्न म्हाईंभटांनी केला आहे. साधी, सरळ, सोपी पण आलंकारिक भाषा हे या चरित्रग्रंथाचे वैशिष्ट्य.

ऋद्धिपूरलीळा उर्फ गोविंदप्रभूचरित्र - ऋद्धिपूरचे चक्रधरांचे गुरू गोविंदप्रभू उर्फ गुंडमराउळ यांनी समाधी घेतल्यानंतर त्यांच्या आठवणी म्हाइंभटाने गोळा केल्या व त्यातून ऋद्धिपूरलीळा उर्फ गोविंदप्रभूचरित्र हा ग्रंथ सिद्ध केला. याचा रचना काळ इ.स. १२८८ आहे. प्राचीन वऱ्हाडी भाषेच्या अभ्यासासाठी हा एक उपयुक्त साधन ग्रंथ आहे. गडू = तांब्या, हारा = टोपली, हेल = पाणी भरण्याचे मडके, पोपट / पावटे = उकडलेल्या तुरीच्या शेंगा, गीदरी, उकड = नीट न बसलेला, कोनटा = कोपरा असे शब्द या ग्रंथात भेटतात.

मराठीतील पहिला कथासंग्रह दृष्टांतपाठ - दृष्टांत म्हणजे छोटीशी बोधकथा होय. प्रत्येक दृष्टांत स्वतंत्र, रोचक आहे. विचारप्रतिपादन, तत्त्वज्ञान, मांडणी, भाषाशैली आणि समाजजीवनाचे निरीक्षण या सर्वच गोष्टींनी हा ग्रंथ अपूर्व आहे. चक्रधरांचे तत्त्वज्ञान विद्वानांना रुचेल अशा मराठीतून मांडणे व अध्यात्मासारखे शास्त्र पेलण्यास समर्थ अशी शब्दसंपत्ती मराठीत रूढ करणे हे केशिराजाचे मोठे कार्य. दृष्टांतपाठ हा फक्त तत्त्वज्ञानाचा ग्रंथ नाही तर मराठीतील लोककथांचे पहिले संकलन आहे. खरे तर 'म्हातारिया'ना तो सोप्या भाषेतील अज्ञानमुंचन करणारा ज्ञानग्रंथ आहे.

रुक्मिणीस्वयंवर - नरेंद्रस्वामींनी लिहलेला हा ग्रंथ म्हणजे मराठीतील पहिले शृंगारिक आख्यानकाव्य. काव्यदृष्ट्या व कालदृष्ट्या साती ग्रंथांमधील पहिल्या क्रमांकाचा ग्रंथ. हे भक्तीतून उमललेले विदग्ध काव्य आहे. ज्या यादवकाळात रुक्मिणीस्वयंवर लिहिले गेले त्या काळात मराठी वाङ्मयाच्या भावसृष्टीवर श्रीकृष्णाच्या भक्तीचे अधिराज्य होते. या काव्याची रचना संस्कृतमधील महाकाव्यांच्या धर्तीवर आहे. वर्णनाची विपुलता व कथानकाची मंदगती यांचा प्रत्यय येतो. रुक्मिणीस्वयंवराच्या कथेवर अनेकांनी रचना केली पण नरेंद्राची सर कुणालाच आली नाही. खरीखुरी कलावंताची दृष्टी असणारा नरेंद्र हा मराठीतील पहिला कवी आहे.

शिशुपालवध - महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. याचा कर्ता भास्करभट्ट बोरीकर आहे. रुक्मिणी-श्रीकृष्ण यांच्या चित्रणासोबतच शिशुपाळवधाचे चित्रण या ग्रंथात आहे. विरक्ती व भक्तीपेक्षा शृंगाराचे चित्रण या ग्रंथात अधिक आढळते. या ग्रंथाविषयी बाईदेवबास म्हणतात भटो ग्रंथु निका जाला : परि निवृताजोगा नव्हेचि (ग्रंथ तर उत्तम झाला आहे पण निवृत्तीमार्गासाठी उपयुक्त नाही!) बाइदेवबासांचे हे उद्गार मराठी समीक्षेचे पहिले वाक्य ठरते.

उद्धवगीता - महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. याचा कर्ता भास्करभट्ट बोरीकर. भागवताच्या एकादशस्कंधावरील मराठीतील ही पहिली टीका ठरते.

वच्छाहरण - महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. कर्ता दामोदर पंडित. दामोदरपंडिताचा कवित्वाचा विलास वृंदावनवर्णन, यमुनावर्णन, श्रीकृष्णमूर्तीवर्णन यांमधून प्रकर्षाने जाणवतो. श्रीकृष्णवर्णन आणि पंथाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार हे दुहेरी कार्य दामोदरांनी साधले आहे.

सैह्याद्री-माहात्म्य किंवा सैह्याद्रवर्णन - सैह्याद्री-माहात्म्य किंवा सैह्याद्रवर्णन हा महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. याचा कर्ता रवळोबास आहे. मूळ ग्रंथ शके १२५४ ते १२७५ यादरम्यान केव्हातरी लिहिला गेला असावा. सैह्याद्रवर्णन काव्यातील सह्याद्री म्हणजे माहूरचा डोंगर. पश्चिम घाटावरील सह्याद्री डोंगराशी या काव्यातील सह्याद्रीचा काही संबंध नाही. सैह्यादी-माहात्म्य हे काव्य, कवीचे वर्णनचातुर्य, त्याची प्रतिभासृष्टी आणि काव्यातला रसाविष्कार या दृष्टीने वाचले तर, रवळोबास हे एक एक प्रतिभावंत कवी होते असे प्रत्ययास येते.

ज्ञानप्रबोध - महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. याचा कर्ता विश्वनाथ. काव्य व तत्त्वज्ञान यांचा संगम; वैराग्याची व भक्तीची शिकवण या ग्रंथात आहे.

अशा वैविध्यपूर्ण ग्रंथाच्या लिखाणातून पंथियांनी मराठीचे साहित्यविश्व प्राचीनकाळी समृद्ध केले आहे. त्यांच्या या साहित्याचा वारसा पुढील काळात संत ज्ञानेश्वरांनी पुढे नेला. संत ज्ञानेश्वर माऊलींचा भावार्थदीपिका, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी अशा ग्रंथांनी मराठी भाषेतील साहित्याला वेगळ्या उंचीवर नेले. तर त्यानंतर संत नामदेव, संत तुकाराम महाराज यांनी केलेल्या रचनांनी भक्तीची परंपरा जनसामान्यांपर्यंत पाझरवण्याचे काम केले.

अशा या समृद्ध मराठीभाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. ही प्रत्येक मराठी माणसासाठी नक्कीच अभिमानाची बाब आहे.

**हेमंतकुमार चव्हाण,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# ४० एकर ऊस जळाला, ऊसाचा झाला कोळसा, ७० ते ८० लाखांचे नुकसान

**जाफराबाद । प्रतिनिधी** - तालुक्यातील हनुमंतखेडा येथील शेतकऱ्यांच्या उसाला शॉर्टसर्किटमुळे आग लागली. ही घटना रविवारी दुपारी घडली. या आगीत येथील जवळपास १५ ते २० शेतकऱ्यांचा मिळून ४० एकर पेक्षा अधिक ऊस जळून खाक झाला. त्यात या शेतकऱ्यांचे ७० लाखांचे नुकसान झाले.

येथील शेतकरी भागवत नामदेव भोपळे यांच्या शेतातील उसाला दुपारी अचानक विजेच्या शॉर्टसर्किटमुळे आग लागली. पाहता-पाहता या आगीने उग्ररूप धारण केले. थोड्याच वेळात आगीच्या प्रचंड ज्वालांनी आजूबाजूच्या सर्वच उसाला आपल्या कवेत घेतले. ही आग इतकी प्रचंड होती की, तिला आटोक्यात आणण्याचे मानवी प्रयत्न अयशस्वी झाले. शेवटी परिसरातील सर्व ऊस कवेत घेऊनच ही आग थांबली. दरम्यान सध्या परिसरात ऊस तोडणी सुरू असून, या शेतकऱ्यांना ऊस तोडीची प्रतीक्षा होती. मात्र, त्यापूर्वीच ऊस जळून खाक झाल्याने हे शेतकरी हवालदिल झाले आहेत, याबाबत पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

भागवत नामदेव भोपळे (५ एकर), अण्णासाहेब बापूराव भोपळे (५ एकर), शिवाजी रामराव भोपळे (२ एकर), गणेश तुकाराम भोपळे (२ एकर), पंढरीनाथ तुकाराम भोपळे (३ एकर), प्रल्हाद सखाराम भोपळे (३ एकर), शिवाजी शेषराव भोपळे (२ एकर), उमेश अंबादास भोपळे (२ एकर), लिंबाजी विठोबा भोपळे (५ एकर), रामेश्वर संतोषराव भोपळे (२ एकर), विशाल अंकुश भोपळे (२ एकर), अनिल प्रभाकर भोपळे (३) एकर), शरद संतोष भोपळे (२ एकर), सिताराम सखाराम भोपळे (१ एकर) या शेतकऱ्यांचा ऊस जळाला.

दरम्यान उसाला पाणी देण्यासाठी जवळपास सर्वच शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन केलेले आहे. याशिवाय काही शेतकरी मोठे पाइप अंथरूणही उसाला पाणी देतात. हे सर्व पाइप उसातच असल्याने ते ही या आगीत जळून खाक झाले आहे. त्यामुळे ठिबक व पाइप जळून प्रत्येक शेतकऱ्याचे आणखी जवळपास २० ते २५ हजारांचे वेगळे नुकसान झाले आहे.

# सह्याद्री विद्यामंदिर या उपक्रमशील शाळेने केला अंगणवाडी सेविकांचा यथोचित सन्मान!





**भांडुप । प्रतिनिधी -** सह्याद्री विद्यामंदिर भांडुप ,पश्चिम. येथील सह्याद्री विद्यामंदिर या शाळेचे २०२४ -२५ हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्यामुळे शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. शाळेने शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी भांडुप मधील शंभर अंगणवाडी सेविकांचा सन्मान केला. ज्याअंगणवाडी सेविका बालकांच्या शारीरिक मानसिक व बौद्धिक व्यक्तिमत्त्वाची घडण, ज्ञानदानाचे व समाजसेवेचे कार्य अविरतपणे करणाऱ्या तसेच अनेक आव्हानांना सामोरे जाऊन यश मिळवणाऱ्या १०० अंगणवाडी सेविकांना सह्याद्री विद्या प्रसारक संस्था, मुंबई यांच्या वतीने संस्थेच्या सन्मा. पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष नारायण सावंत, चिटणीस जगन्नाथ अंबरे, सहचिटणीस रमेश राणे, खजिनदार प्रदिप वारणकर, संस्थेचे विश्वस्त अरूण राणे, रविंद्र राणे, संजय पवार तसेच पूर्व प्राथमिक, प्राथमिक विभागाच्या मुख्या मनिषा चिंदरकर, उच्च माध्य.विभागाच्या पर्यवेक्षिका विद्या राणे आणि सर्व विभागाचे शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमात अंगणवाडी सेविकांनी आपल्या मनोगतातून सांगितले, की सह्याद्री विद्यामंदिर ही भांडुपमधील अशी एकमेव पहिलीच शाळा आहे की ज्यांनी आज आमच्या कार्याचा आढावा घेऊन आमचा सन्मान केला. त्याबद्दल त्यांनी संस्थेचे व सर्व शिक्षकवृंदांचे आभार मानले. त्यानंतर प्राथ.विभागाच्या मुख्या मनिषा चिंदरकर यांनी आपल्या मनोगतात संस्था नेहमी शिक्षकांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्यामुळे सर्व शिक्षकही मनापासून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आणि आपल्या मराठी शाळेचे अस्तित्व टिकविण्यासाठी खूप मेहनत घेत असतात असे सांगितले व संस्थेचे आभार व्यक्त केले. त्याचबरोबर संस्थेचे खजिनदार प्रदिप वारणकर यांनी अंगणवाडी सेविकांचा एवढा मोठा प्रतिसाद पाहून सर्व पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विभागतील सर्व शिक्षकवृंदांचे कौतुक केले. यापुढेही असेच सहकार्य सर्वांकडून मिळत राहो जेणेकरुन आपली मराठी माध्यमाची विद्यार्थीसंख्या वाढली पाहिजे आणि प्रगती झाली पाहिजे व टिकली पाहिजे. असे मत व्यक्त केले. संस्था तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील असे मत व्यक्त केले. अंगणवाडी सेविकांचा सन्मान सोहळा या आगळ्या वेगळ्या सोहळ्याची सांगता पसायदानाने झाली.

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४

# प्राथमिक छाननी गुणांकन प्रसिध्द करण्यासाठी सूचना व हरकती पाठविण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. पुरस्कारासाठी ऑनलाईन सूचना व हरकती सादर करण्याचा सुरुवातीचा दि. १५ फेब्रुवारी,२०२५ तर सुचना व हरकती सादर करण्याचा अंतिम दि. १८ फेब्रुवारी,२०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहिल. तरी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार गुणांकन तक्ते अवलोकनासाठी व सूचना/ हरकती सादर करण्यासाठी ऑनलाईन https:// shivchhatrapatiawards. com या लिंकवर ऑनलाईन अर्ज सादर करण्यात यावे, असे आवाहन क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जेष्ठ क्रीडा महर्षिकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरीता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/ शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) व जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक), असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शासनाने दि.२९ डिसेंबर,२०२३ व दि.२५ जानेवारी,२०२४ नुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली,२०२३ विहित केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्या पुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू/ व्यक्ती यांच्याद्वारा दि.१४ जानेवारी ते २६ जानेवारी,२०२५ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जाची प्राथमिक छाननी करण्यात आलेले असून, प्राथमिक छाननीचे गुणांकन तक्ते शासननिर्णय क्रं. शिछपु.२०२३/प्र.क्रं.१८८/ क्रीयुसे-२, दि.२९ डिसेंबर,२०२३ मधील नियम क्रं.१.१९, नियम क्रं.१.२०, नियम क्रं.१.२१ अनवये एकूण गुणांकनासह दि.१५ ते १८ फेब्रुवारी,२०२५ या कालावधीत सूचना व हरकतीसाठी https:// shivchhatrapatiawards. com या लिंकवर प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदरचे प्राथमिक छाननी अहवाल हे अंतिम नसून, त्यामध्ये आपल्या सूचना व हरकतींनुसार बदल होऊ शकतो, तसेच सूचना/ हरकतीनंतर सदरचा अहवाल पुन्हा प्रसिध्द करण्यात येणार नाही. प्राथमिक छाननी अहवालात केलेल्या पुरस्कार गुणांकनाबाबत काही आक्षेप किंवा सूचना असतील तर नमुन्यात सादर कराव्यात.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त AI तंत्रज्ञानाचा वापर करून संकल्प चित्र स्पर्धा




'ए.आय. अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता' कृत्रिम बुद्धिमत्ता(AI) हे सद्या जगभरात वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे. ही आधुनिक तंत्रज्ञानातील एक महत्त्वाची क्रांती ठरणार आहे. योग्य वापराने (AI) आपल्या समाजाला अधिक प्रगत आणि सुसंवादी बनवू शकते. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मानवी बुद्धिमत्तेसारखे शिकण्याची क्षमता मशीन्समध्ये आणि त्या मशीनमधल्या सॉफ्टवेअर प्रोग्रॅम्समध्ये तयार करण्यासाठी वापरले जाते. याद्वारे भूत, भविष्य आणि वर्तमान काळातील चित्र उभारले जाऊ शकते. या तंत्रज्ञानाचा सर्वच क्षेत्रात झपाट्याने विकास होत असल्याने साहित्य क्षेत्रात देखील वापर सुरू झाला आहे.

मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने २७ फेब्रुवारी या दिवशी दादर सार्वजनिक वाचनालय व धुरु हॉल ट्रस्ट आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान गोरेगाव यांच्या सहकार्याने कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने श्री सर्वोदय एज्युकेशनल ट्रस्ट मुंबईच्या सहकार्याने संघाच्या वतीने (AI) तंत्रज्ञानाचा वापर करून मराठी भाषा गौरव दिन संकल्प चित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सर्वोत्कृष्ट तीन चित्रांना रोख पारितोषिक आणि सहभागी होणाऱ्या सर्वांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. दिनांक २५ फेब्रुवारी पर्यंत चित्राची इमेज Chalval1949gmail.com किंवा ८७७९९८३३९० यावर पाठवावी. अधिक माहितीसाठी स्पर्धा प्रमुख राजन देसाई यांच्याशी संपर्क साधावा. (AI) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता' मराठी भाषेसाठी किती उपयुक्त या विषयावर गेली ३० वर्षे संगणक क्षेत्रात अध्यापन करणारे भानुदास साटम सरांचे व्याख्यान आणि ४९ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा, अभिजात मराठी भाषा चला ज्ञानभाषा करूया या राज्यस्तरीय लेखस्पर्धेचे पारितोषिक वितरण या कार्यक्रमात होणार आहे.

# चौसष्ट कलांमध्ये जीवनाचा आनंद, सामर्थ्य व सौंदर्य

## संजयकुमार चव्हाण यांचे प्रतिपादन



**मंठा । प्रतिनिधी -** शहरातील अशोका पब्लिक स्कूल व छत्रपती संभाजी राजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चे 'नृत्यरंजन 'वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पालक मंठा शहराच्या नगराध्यक्ष वंदना वैजनाथ बोराडे, पालक प्रतिनिधी दत्ता रामपूरकर, नंदकिशोर जाधव उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अशोक भाऊ चव्हाण सेवा संस्थेचे संस्थापक संचालक संजयकुमार चव्हाण होते.

नृत्यरंजन सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली तर राज्य गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध कलाकृतींचे बहरदार सादरीकरण केले. सण उत्सवा सोबतच मंचावर लावणी भारुड गोंधळ महाराष्ट्राची लोकधारा व लोककला सादर करण्यात आल्या.

अध्यक्षीय भाषणात चव्हाण म्हणालेचौसष्ट कलेमध्ये च जीवनाचा आनंद, सामर्थ्य व खरे सौंदर्य*आहे. अशोका स्कूलने कधीही गुणवत्तेची तडजोड केली नाही. गुणवान शिक्षकामुळे संस्थेचा नावलौकिक निर्माण झालेला आहे. यामध्ये सर्वांचा सिंहाचा वाटा आहे. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष संजयकुमार चव्हाण यांनी केले.

एकदंता, वेलकम, डिगी डिगी, काली महाकाली,चिल चिल चिल्ला के, जयस्तु जयस्तु भारतम, धक धक धरती,स्कूल नही जाना है अशा विविध गाण्याने सर्वांचे लक्ष वेधले. पास नही तो फेल, पार्टी तो बनती है, पुष्पा, मजे मजेची शाळा, योद्धा बन गई, बुमरो बुमरो, अंबाबाईचा गोंधळ, पंजाबी मॅशअप, हम दीप शिक्षा के है, बिहू डान्स अशा विविध कला प्रकारात वर विद्यार्थ्यांनी ठेका धरला होता. बाल नाट्य शिवबाच नाव, नाच ग बया सह सोशल मीडियाचा ड्रामा याद्वारे सर्व प्रेक्षकांना मंत्रमुग्ध विद्यार्थ्यांनी कलागुणातून केले. त्यामुळे उपस्थित रसिकांनी भरघोस बक्षिसाची पावती ही या विद्यार्थ्यांना दिली. यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तब्बल चार तास चाललेल्या या कार्यक्रमांमध्ये शेवटपर्यंत प्रेक्षक जागेवर खेळून बसले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आदिवासी ठरते ऑनलाइन नाटिका राष्ट्रभक्तीपर गीते फिल्मी गीते लोकगीते रिमिक्स गीते सादर करून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक वृंद अलका देशमुख,वंदना मोरे, रेखा चिंचोले, इर्शाद पठाण, प्रियांका चिंचने, प्राजक्ता कुलकर्णी, गणेश वायशे, राधिका जोशी, आरती कुलकर्णी, कांचन एखांडे, अनंत निर्वळ, स्वाती हिवाळे, धनश्री कापडे, सविता राठोड, प्रणिता दळवी, शिवाजी काळे ,ज्योती शहाणे , केशव खणके, श्याम देशमुख आदींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रेणूका विसपुते यांनी तर आभार प्रदर्शन अनिल निर्वळ यांनी केले.

# आनंदी जीवनासाठी तणाव मुक्तीचे सुत्र अनुसरावे - पवन पोपळघट



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** संवेदना प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण रुग्णालय टेंभुर्णी येथे कार्यरत (जाफराबाद) तालुका समन्वयक श्री.पवन पोपळघट यांनी श्रीमती. जे.बी.के.विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालय टेंभुर्णी येथे विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य या विषयी मार्गदर्शन केले. सध्याची परिस्थिती पाहता विद्यार्थी असो किंवा सामान्य नागरिक प्रत्येक व्यक्ती मानसिक ताण -तणावात जीवन जगत असतो असे मानसोपचार तज्ज्ञ पवन पोपळघट यांनी प्रतिपादन केले. मानसिक आजारा बद्दलची कोण कोणती लक्षणे असतात, मानसिक आजारांचे कारणे काय असतात, त्यावरील उपचार पद्धती, मानसिक आजारातून बाहेर कसे पडायचे! याविषयी व मानसिक स्वास्थ्य चांगले कसे राहील, याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. त्यांनी उपस्थितीत विद्यार्थ्यांना सल्ला दिला की सकस आहार घेणे, नियमित व्यायाम करणे ,ध्यानधारणा करणे , योग प्राणायाम करणे, तणाव मुक्त जीवन जगणे, विविध प्रकारचे खेळ खेळणे, आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देणे, निसर्गरम्य , ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे, आवडीचे पुस्तकं ,ग्रंथ वाचन करणे,मित्रांसोबत विचारांची देवाणघेवाण करणे हे सर्व आनंददायी जीवनासाठी आवश्यक सुत्र आहे. या सुत्रांचा वापर केला तर मानवी जीवन आनंदमय सुखमय होईल,मन उत्साही रहिल. त्यामुळे मानवी जीवन तणाव रहित जगता येईल.आपले मानसिक व शारीरिक आरोग्य सुदृढ निरोगी रहावे असे वाटत असेल तर, प्रत्येकांनी आपल्या दिनचर्येत चांगल्या बाबींचा जाणिवपूर्वक वापर केला पाहिजे.तरच मानसिक स्वास्थ्य चांगले राहील. असे मत मांडले, श्रीमती जे बी के विद्यालयात आयोजित या कार्यशाळेस विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.कार्यशाळेस प्राचार्य. नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक. पंजाबराव सोळंके पर्यवेक्षक. धनंजय पुराणे, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख. एस. बी.बोरकर, जेष्ठ शिक्षक गणेश सावसक्के कैलास भूतेकर व इतर शिक्षक वृंद यांची उपस्थित होते.

# पत्रकारांचे प्रश्न विधान परिषदेत मांडण्यासाठी पत्रकार मतदारसंघ निर्माण करा - सेराज कुरेशी



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** इंडियन जर्नलिस्ट एसोसिएशनचा सातवा आंतरराष्ट्रीय पत्रकार पुरस्कार, परिषद आणि चर्चासत्र मौलाना आझाद संशोधन केंद्र सभागृह, औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर), महाराष्ट्र येथे पार पडले.

या कार्यक्रमात देश-विदेशातील शेकडो पत्रकार सहभागी झाले होते. या परिषदेला संबोधित करताना प्रमुख पाहुणे इंडियन जर्नलिस्ट एसोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सेराज अहमद कुरेशी यांनी महाराष्ट्र सरकारची खरडपट्टी काढत सरकारने पत्रकार संरक्षण कायदा केला असला तरी त्याचा खरा लाभ पत्रकारांना मिळत नसल्याचे सांगितले. पत्रकारांना देशाचा चौथा स्तंभ म्हटले जात असले तरी आजही पत्रकार त्यांच्या हितासाठी लढत आहेत, याकडे सरकारने लक्ष देण्याची गरज आहे. पत्रकार संरक्षण कायदा करण्यासाठी भारतीय पत्रकार संघ रस्त्यावर ते संसदेपर्यंत लढा देणार आहे. महाराष्ट्र शासनाने विधान परिषदेत शिक्षक मतदारसंघाप्रमाणे पत्रकार मतदारसंघ निर्माण करावा. जेणेकरून पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी आमदार विधान परिषदेत पत्रकारांना आपले म्हणणे मांडता येईल. पत्रकारांच्या हिताचे रक्षण आणि सध्याच्या वातावरणात पत्रकारितेचे आव्हान यावर ते म्हणाले की, पत्रकारांनी माहितीपूर्ण आणि सकारात्मक पत्रकारितेवर भर देण्याची गरज आहे. प्रत्येक शब्दाला स्वतःची चव असते, त्यामुळे पत्रकारांनी शब्द निवडीकडे विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. बदलत्या वातावरणात पत्रकारांना वेळोवेळी कार्यशाळा आयोजित करून त्यांना नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञान सुविधा आणि सोप्या भाषेच्या शैलीचे ज्ञान देण्याची गरज आहे.

विशेष अतिथी इंडियन जर्नलिस्ट एसोसिएशनचे झारखंड राज्य अध्यक्ष देवानंद सिन्हा म्हणाले की, पत्रकारितेवर पैसा, सत्ता, जात, धर्म यांचा प्रभाव नसावा. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा प्रदेशाध्यक्ष मोहम्मद ताबीश व संचालन प्रदेश सरचिटणीस मिर्झा शफिक बेग होते. कार्यक्रमाचे संयोजक मोहम्मद ताबीश यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. यावेळी पत्रकारितेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारांना 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार' व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या परिषदेत महिला आघाडीच्या राष्ट्रीय सचिव मधू सिन्हा, नेपाळचे ज्येष्ठ पत्रकार इस्तेयक आलम, चंदन महतो, प्रेम स्वरूप श्रीवास्तव, शेख झाकीर हुसेन (विदर्भ प्रदेशाध्यक्ष), सय्यद अन्वर अली (राज्य संघटन मंत्री), सलीम मोहम्मद कुरेशी (पालघर), जावेद शेख यवतमाळ, अधिवक्ता राहुल शेंडे मोहम्मद खान, अरविंद, प्रदेशाध्यक्ष डवारुल हक. लखनौ, मंजूर अहमद पख्तून जम्मू-काश्मीर प्रदेशाध्यक्ष, शैलेशसिंग वाघेला गुजरात प्रदेशाध्यक्ष, अनिल खडसे हिंगोली, जावेद खान प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र, मोहम्मद ताबीश प्रदेश अध्यक्ष मराठवाडा महाराष्ट्र, मिर्झा शफीक महाराष्ट्र महासचिव, हमीम शेख लातूर, बिलाल कुरेशी उस्मानाबाद, गणेश धनगर जळगाव, सय्यद अहमदनगर जिल्हाध्यक्ष अहमदनगर शेखर शेख, शेखर अहमद पख्तून, ए. जिल्हाध्यक्ष औरंगाबाद, आमेर खान जिल्हा जालना, सुनील भारती ,मजर सौदागर जाकीर भाई, शेख मुजीब बसित बेग ,सुनील नरोडे,राहुल मुळे, तरंग कांबळे, गणेश सातपुते आदी पत्रकार उपस्थित होते.

# शिवसिंधू फाऊंडेशनच्या वतीने धारावीत मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**धारावी । प्रतिनिधी -** आरोग्य शिबीर म्हणजे आरोग्याच्या तक्रारींचे निदान आणि उपचार करण्यासाठी आयोजित केलेले एक विशेष शिबीर किंवा कार्यक्रम आहे. या शिबिरांमध्ये वैद्यकीय तपासण्या, आरोग्याचे मार्गदर्शन, रोगनिदान, औषधोपचार, आणि इतर संबंधित सेवा दिल्या जातात अशाच प्रकारचे शिबीर शिवसिंधू फाऊंडेशन व मैत्रीबोध परिवार आणि ट्रायम्फ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने धारावीतील श्री गणेश विद्या मंदिर शाळेत संप्पन्न झाले.यावेळी दंतचिकित्सा, डोळ्याची तपासणी,डायबिटीस, रक्तदाब आणि इत्तर आजाराची चाचणी करुन मोफत औषधं आणि मोफत चष्माचे वाटप करण्यात आले. यावेळी परिसरातील हजारो गरजू नागरिकांनी याचा लाभ घेतला.



आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी शिवसिंधू फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री राजेशजी खंदारे, श्री नरसिंग कावळे,सुनिल शेरखाने, योगेश व्हटकर, ड. किशोर शिंदे तसेच मैत्रीबोध परिवार आणि ट्रायम्फ फाऊंडेशन यांचे विशेष सहकार्य लाभले.

शिवाय इत्तर सभासदांनी विशेष मेहनत घेऊन आरोग्य शिबीर यशस्वीरित्या पार पाडले.

## व्हाईस ऑफ मिडिया साप्ताहिक विंगच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सय्यद अफसर तर सचिवपदी शब्बीर पठाण



**जालना । प्रतिनिधी -** व्हाईस ऑफ मीडियाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांच्या मार्गदर्शनाखाली व साप्ताहिक विंगचे जिल्हा अध्यक्ष सुयोग खर्डेकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कार्यकारिणी नुकतीच येथील एका हॉटेलच्या सभागृहात घोषित करण्यात आली.

यावेळी चर्चा करून सर्वानुमते असे ठरले की, व्हाईस ऑफ मीडिया संघटनेच्या साप्ताहिक कार्यकारणीमध्ये सचिव पदासाठी जालना आंदोलनचे संपादक शब्बीर पठाण यांची निवड करण्यात आली. तर जिल्हा संघटकपदी अनुक्रमे साप्ताहिक श्लोक टाइम्सचे संपादक अमित आनंद, साप्ताहिक परिवर्तन दर्पणचे विकास काळे, साप्ताहिक जलसम्राट चे उपसंपादक सचिन सर्वे, तसेच जिल्हा उपाध्यक्षपदी भ्रष्टाचार विरोधी लोकाधिकारचे संपादक सय्यद अफसर यांची नियुक्ती करण्यात आली. तर जिल्हा कार्यकारणी सदस्यामध्ये देवचंद सावरे, युवराज कुरील, गोपाल गोमतीवाले, शिवाजी बावणे, विजय जाधव, नटवर किल्लेदार, यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांचा व्हाईस ऑफ मि डियाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी आणि जिल्हाध्यक्ष सुयोग खर्डेकर यांच्यावतीने सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष श्री. विकासकुमार बागडी, जिल्हाध्यक्ष श्री. सुयोग खर्डेकर, सय्यद अफसर, शब्बीर पठाण, गोपाल गोमतीवाले, देवचंद सावरे, युवराज कुरिल, सचिन सर्वे यांची उपस्थिती होती.

# लॉयन्सतर्फे मुलींसाठी आज मोफत सर्वाइकल कॅन्सर लसीकरण


**जालना । प्रतिनिधी -** लॉयन्स क्लब ऑफ जालना आणि कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी मोफत सर्वाइकल कॅन्सर लसीकरण अभियान राबवले जात असून, पहिल्या टप्प्यात मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी दीड हजार मुलींचे लसीकरण करण्यात येणार आहे. पालकांनी लस घेण्यासाठी मुलींना प्रोत्साहित करावे आणि अद्यापपर्यंत नोंदणी केली नसेल तर शिबिरस्थळी आधार कार्ड आणि संमती पत्रासह उपस्थित राहून आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्डा यांनी केले आहे.

सवाईकल कॅन्सर लसीकरण शिबिर मंठा रोडवरील महेश भवनात सकाळी ८ ते संध्याकाळी ६ या वेळेत पार पडणार आहे. नावनोंदणीला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. काही कारणास्तव कुणी आतापर्यंत नाव नोंदणी केली नसल्यास त्यांनाही संधी मिळावी म्हणून शिबिर स्थळीही नाव नोंदणी करून लस घेता येणार आहे. या पहिल्या टप्प्यात शहर व ग्रामीण भागातील पंधराशे मुलींचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या मोहिमेत मुंबईहून तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आणि स्थानिक डॉक्टर, परिचारिका या उपक्रमात सहभागी होणार आहेत. स्तनाच्या कर्करोगानंतर महिलांमध्ये आढळणारा सर्वाधिक गंभीर आजार म्हणजे सवाईकल कॅन्सर अर्थात गर्भाशय मुखाचा कर्करोग. भारतात दरवर्षी ८० हजार महिलांना हा आजार होतो, त्यापैकी जवळपास ४० हजार महिलांचे या आजाराम ुळे निधन होते. हा आजार ह्युमन पॅपिलोमा विषाणूमुळे होतो. योग्य वयात दिल्या जाणाऱ्या लसीकरणामुळे या विषाणूविरोधात शरीराला संरक्षण मिळू शकते. लॉयन्स क्लबतर्फे समाजात महिला आरोग्य आणि कर्करोग प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यासाठी सतत वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. या लसीकरण मोहिमेचा उद्देश जालना जिल्ह्यातील मुलींना गंभीर आजारापासून सुरक्षित ठेवणे आणि भविष्यातील आरोग्यसंकटांना प्रतिबंध करणे हा आहे.

आरोग्यसेवेच्या क्षेत्रात जिल्ह्यासाठी ही एक मोठी संधी ठरणार आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. कृष्णनाथ पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा मीना, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धूपे, प्राथमिक शिक्षणाधिकारी कैलास दातखिळ, लायन्सचे माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया, विजयकुमार बगडिया आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### गुरुगणेश दृष्टीहीन विद्यालयाच्या ३९ मुलींचीही लसीकरणासाठी नावनोंदणी

सवाईकल लसीकरण मोहिमेला उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जालना येथील गुरु गणेश दृष्टीहीन विद्यालयाच्या ३९ मुलींचीही लसीकरणासाठी संमतीपत्रे प्राप्त झाली आहेत. ही केवळ संम तीपत्र नाहीत, तर एका मोठ्या सामाजिक कार्याची नांदी आहे! शिबिराच्या पूर्वसंध्येला प्रकल्पाने सर्वात सार्थक आणि हृदयस्पर्शी टप्पा गाठला आहे, असे मला वाटते. दृष्टिहीन मुलींना हा लसीकरणाचा लाभ मिळणे ही एक अतिशय म हत्त्वाची आणि सन्मानास्पद गोष्ट आहे, असे क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्डा यांनी स्पष्ट केले.



जालना जिल्ह्यातील मुलींनी व त्यांच्या पालकांनी या उपक्रमात सहभाग घेऊन आरोग्य सुरक्षेच्या दिशेने पुढचे पाऊल टाकावे, असे आवाहन क्लबच्यावतीने अध्यक्ष जयश्री लड्डा, सचिव मंजू श्रीमाळी, कोषाध्यक्ष कल्पना बियानी आदींनी केले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.